विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

मासिकाचे नाव	:	**सध्दर्म : त्रैमासिक**
संचालक	:	गुंडोपंत, हरिभक्त
प्रकाशक	:	सध्दर्म प्रकाशन
प्रकाशन वर्ष	:	१९८८
वर्ष	:	तेविसावें
अंक	:	तिसरा
पृष्ठे	:	१६ पृष्ठे

गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती

गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०

गणपत्रिका क्रमांक : ७९

Registered with the Registrar of Newspapers for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

सद्धर्म

त्रै मा सि क

संस्थापक

गुंडोपंत हरिभक्त

वर्ष तेविसावें

अंक तिसरा

भाद्रपद : १९१०

आक्टोबर १९८८

वार्षिक ऐच्छिक देणगी

किमान

पांच रुपये

खरें ऐश्वर्य....

ईश्वरस्य भावः ऐश्वर्यम्. ऐश्वर्य म्हणजे ईश्वरत्व. ईष्टे इति ईश्वरः जो इच्छामात्रानें विश्व निर्माण करतो, त्याचें परिपालन करतो तो ईश्वर. उत्पत्ति स्थिति व परिपालनाच्या दृष्टीनें अत्यावश्यक विश्वाचा विलय सुद्धां करतो. वरील सर्व क्रिया करतांना तो सर्वत्र समबुद्धि आणि सर्वहितकांक्षी असतो.

त्या दृष्टीनें पहातां–जी धनधान्यसंपत्ति–वैभव सर्वांच्या (व्यक्तीच्या नव्हे) हिताच्या जाणिवेनें मिळविलें असेल तेंच खरें ऐश्वर्य. तोच खरा अर्थ !

वैयक्तिक हिताचाच विचार करून मिळविलेला अर्थ (पैसा) कसा अनर्थकारक ठरतो हें आपण पहात आहोंतच !

पत्रव्यवहाराचा पत्ता :

ह. ज. दामले, संपादक 'सद्धर्म'

३२४, वि. प. रोड, मुंबई ४००००४

या अंकात....

१) तेंचि सार जाण योगाचें ... २
२) खरें लक्ष्मीपूजन ... ३
३) दारीं हत्ती झुलती ... ७
४) जमीन असमानाचें अंतर ... १०
५) तुझ्या चरणींच्या गंगा ... १२
६) दुर्लभः कार्यकर्ता ... १५
७) सेवेसी श्रुत होय ... १६

कृपया....

१. मनिऑर्डर श्रीधर भालचंद्र आणि कंपनी कापडाचे व्यापारी, प्रार्थना समाज मुंबई ४ या पत्त्यावरच पाठवावी. मनी ऑर्डरचे कूपनवर आपला पूर्णपत्ता व पूर्णनांव अगत्यानें लिहावें. ग्राहक नवा कीं जुना याचा उल्लेखही कृपया करावा.

२. देणगी शक्यतों चेकनें पाठवूं नये. पाठविणें अपरिहार्य असेल तर 'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट' या नांवेंच चेक लिहावा.

तेंचि सार जाण योगाचें....

आपण भजन, पूजन, व्रतांचें आचरण, वा योगसाधन करीत असतों, आणि प्रायः अपेक्षित फलप्राप्ति न झाल्यामुळें व्यथित वा निराश होत असतों. आपलें कर्म विफल कां झालें ? याचा फारसा विचार आपण करीत नाहीं. साधनेच्या साफल्याकरतां मन आणि बुद्धी यांच्या एकरूपतेची आवश्यकता असते. साधनेच्या सांगतेचें हें रहस्य ज्ञानेश्वर उलगडून दाखवितात—

अर्जुना समत्वचित्ताचें । तेंचि सार जाण योगाचें ।
जेथ मन आणि बुद्धि । ऐक्य आथी ॥
तो बुद्धियोग विवरितां । बहुतें पाडें पार्था ।
दिसे हा अरुता । कर्मभोगु ॥
परि तेंचि कर्म आचरिजे । तरीच हा योगू पाविजे ।
जें कर्मशेष सहजें । योगस्थिति ॥
म्हणोनि बुद्धियोगु सधरु । तेथ अर्जुना होई स्थिरु ।
मनें करू अव्हेरु । फळहेतूचा ॥
जे बुद्धियोगा योजिले । तेचि पारंगत जाहले ।
इहीं उभयबंधीं सांडिले । पापपुण्यीं । ज्ञने० २।२७२।७७

हे अर्जुना जेव्हां मन आणि बुद्धि यांचें ऐक्य असतें तेव्हांच चित्ताची समता होते. चित्ताची समता म्हणजेच योग. ॥ ७२ ॥ पार्था, मननपूर्वक बुद्धियोगाची व कर्मयोगाची तुलना केली असतां, हा फलेच्छारहित पण अहंकारयुक्त कर्मयोग फारच कमी योग्यतेचा आहे. ॥ ७४ ॥ परंतु विशुद्धकर्मयोगाशिवाय बुद्धियोग साध्य होत नाहीं. मनाची आणि बुद्धीची सांगड बांधून केलेलें कर्म म्हणजेच बुद्धियोग ॥ ६५ ॥ हे धनंजया–मन आणि बुद्धि यांची समानता-एकरूपता-रूपी योग (बुद्धियोग) सर्व श्रेष्ठ आहे. त्याचे ठिकाणीं स्थिर रहा. तो योग आचरतांनां फलेच्छे-पासून दूर रहा. फलाची अपेक्षा करूं नकोस. ॥ ६६ ॥ हे पार्था हा बुद्धियोग ज्यांना साध्य झाला, तेच पापपुण्यात्मक लौकिक बंधनापासून मुक्त होतात. 'मुक्तरूप' होतात. ॥ ७७ ॥

मन संकल्पविकल्पात्मक असल्यामुळें निश्चयात्मक बुद्धीच्या सहकार्याशिवाय तें कोठेंही स्थिर होत नाहीं. आणि मनाशीं संलग्न नसलेली बुद्धि दोर तुटलेल्या पतंगाप्रमाणें कोठेंतरी स्वैर भटकत रहाते. त्या स्वैराचाराला 'बुद्धिवाद' म्हणतात. आजच्या अनर्थकारक काळांत भारताला 'बुद्धि-वादाची' नव्हे, तर 'बुद्धियोगाची' अत्यंत आवश्यकता आहे.

दादरला देणगी हातीं देण्याचा पत्ता :
श्री गंगाधर प्रिंटिंग प्रेस
वेस्टर्न रेल्वे फूटब्रिजच्या समोर
दादर, मुंबई ४०० ०२८

देणगी मनीऑर्डरनें धाडण्याचा पत्ता—
श्रीधर भालचंद्र आणि कंपनी
कापडाचे व्यापारी.
१४८ प्रार्थना समाज नाका, गिरगांव, मुंबई ४

खरें लक्ष्मीपूजन....

अश्विन महिन्याच्या अमावास्येला लक्ष्मीपूजन करण्याची फार प्राचीन प्रथा आहे. जीवनांत वस्तुतः जीवनावश्यक वस्तूंच्या विनिमयाचें साधन असलेल्या रुपये आणे पैंना अवास्तव महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें तेव्हांपासून लक्ष्मी म्हणजे सोनेंनाणें रुपये असें मानण्यांत येऊं लागलें. आणि लक्ष्मीची पूजा म्हणजे सोन्या रुप्याची, त्यांच्या मोहोर गिन्या किंवा रुपयांची पूजा, हिऱ्यामाणकांची मोत्यांची पूजा असें समीकरण रूढ झालें. त्यामुळें ज्याच्या जवळ रुपये मोहोरा असतील तोच लक्ष्मीपूजन करूं शकेल, त्यानेंच लक्ष्मीपूजन करावें हें क्रमप्राप्तच झालें. म्हणून राजे रजवाडे, श्रीमंत, सावकार व व्यापारी हेच लक्ष्मीपूजन करीत राहिले. आजही प्रामुख्यानें तसेंच घडत आहे. सामान्य माणूस लक्ष्मीपूजन करीत नाही, कारण त्याच्या जवळ भरपूर द्रव्य नसतें. तें एका अर्थी खरेंही असतें.

वस्तुतः पैसेवाल्यांनींच लक्ष्मीपूजन करावें हें खरें नाहीं. कारण मुळांतच लक्ष्मी म्हणजे रुपये पैसे हें वास्तव सत्य नव्हे. तो एक आभास आहे. कसा तो पहा—

कोशकारांनी 'लक्ष्मीः पद्मालया पद्मा कमला श्रीः हरिप्रिया ॥ इंदिरा लोकमाता मा, अशीं लक्ष्मीचीं नांवें दिलीं आहेत. त्यांतील 'लोकमाता' आणि 'मा' हे शब्द महत्त्वाचे आहेत. जी मातेप्रमाणें सर्व लोकांचें —प्राणिमात्रांचें धारणपोषण करते ती लक्ष्मी. अन्नधान्यानेंच सर्वांचें प्रत्यक्ष धारणपोषण होत असतें म्हणून अन्नधान्य म्हणजेच लक्ष्मी. धनधान्य असाही शब्दप्रयोग करीत असतों. त्यांतील धन शब्दाचा धान्य असाच अर्थ आहे. धन् या धातूपेंच धान्य हें रूप आहे. (धन-धान्ये पाणिनि ३ प) धनापासून म्हणजेच धान्यापासून धान्य निर्माण होतें. द्रव्यापासून द्रव्यही निर्माण होत नाहीं आणि धान्यही निर्माण होत नाही धान्य पेरलें तर तें उगवतें दुपटी चौपटीनें धान्य निर्माण करतें. आणि तेंच खऱ्या अर्थानें प्राणिमात्रांचें पोषण करतें. धान म्हणजे पोषण. त्याविषयीं जें साधु तें धान्य. (धाने साधुः इति धान्यम्) अशी त्याची शास्त्रकारांनी व्युत्पत्ति दिली आहे.

रुपये पैसे खऱ्या अर्थानें पेरतां येत नाहींत. पैशांपासून पैसे उत्पन्न होत नाहींत. लक्ष्यार्थानें पैसे पेरले जातात! पण त्यांपासून पैसे पिकत नाहींत. रुपयांच्या रोपांवर मटांची कणसें येतात—त्यांत सत्तेचीं अधिकाराचीं टपोर कस्चर मोत्यें असतात असें म्हणतात. आजकाल सर्वत्र डॉलर पौंड रुपये इत्यादिकांची पेरणी, लावणी केली जात आहे पण ती कोणालाच सुफलदायी होत नाहीं हें आपण पहात आहोंच. अमेरिकेनें पाकिस्तानांत मुक्त हस्तानें पेरलेल्या डॉलरनां सर्वविध्वंसक 'ॲटम् बॉबचीं' फळें येत आहेत. इराण, इराक, अफगाणिस्थान, श्रीलंका इत्यादि देशांत इतर राष्ट्रांनीं पेरलेल्या पैशांना अशींच विनाशकारक फळें येत आहेत. त्या त्या देशांत पेरलेल्या डॉलर पौंडांपासून डॉलर वा पौंड निर्माण होत नाहींत हें वास्तव सत्य आहे.

लोकांना कर्जाऊ दिलेल्या पैशांचे व्याजाच्या रूपानें येणारे पैसे हे पैशांना लागणारे, पैशांपासून निर्माण झालेले पैसे असें म्हणतां येईल, पण तें तात्त्विकदृष्ट्या बरोबर नाहीं.

सावकारांकडून बँकांकडून किंवा संपन्न-बलाढ्य राष्ट्रांकडून केल्या जाणाऱ्या या पैशांच्या शेतींतून बाह्यतः पैसे पिकतात हे खरें. पण तें धान्याच्या पिकासारखें तृप्ति समाधान धारणपोषण करीत नाहीं, तर असंतोष असमाधान उपासमार आणि कुपोषण करतें. आजकाल पैसा अपार झाला आहे, पण धारणपोषणक्षम शुद्ध सात्विक अन्नधान्य दुर्मिळ झाले आहे.

कारण लक्ष्मी म्हणजे पैसे-द्रव्य-अर्थ असें समजूनच सर्व व्यवहार केले जातात. अर्थशास्त्र म्हणजे केवळ पैशांची उलाढाल सुलभतेनें करण्याचें शास्त्र नव्हे. तें केवळ पैशांचा विचार करणारें शास्त्र नाहीं. आर्य चाणक्यांच्या कौटिलीय अर्थशास्त्रांत—

सुखस्यमूलं धर्मः, धर्मस्यमूलं अर्थः,
अर्थस्यमूलं राज्यम्, राज्यमूलं
इन्द्रियजयः'

या चार सूत्रांत मानवाचें सौख्य, त्याचें धारणपोषण करणारा धर्म, धारणपोषणाकरतां अत्यावश्यक अन्नधान्य, तें निर्माण करण्याकरतां व त्याचें रक्षण करण्याकरतां अत्यावश्यक असलेलें शासन म्हणजे अर्थ असें म्हटलें आहे.

'सर्वारंभास्तण्डुलाः प्रस्थमूलाः' (कोणतीही गोष्ट आरंभायची तर निदान शेरभर तरी तांदुळ जवळ असले पाहिजेत.) हें सुभाषित प्रसिद्ध आहे. जीवनाचा मूलाधार धान्य हेंच आहे हाच त्याचा आशय आहे. अश्विन कार्तिक महिन्यांत घरांत नवीन धान्य आलें म्हणजे शेतकरी 'लक्ष्मी घरा आली' असेंच म्हणत असतो. नववधू आपल्या नव्या घरांत प्रवेश करते तेव्हां उंबरठ्यावर धान्यानें भरून ठेवलेलें मापटें पायानें उंबरठ्याच्या आंत ढकलते आणि त्यांतून ओसंडलेल्या धान्यावरून चालत घरांत प्रवेश करते. तेव्हां मोठ्या आनंदानें वाजत गाजत आलेली नववधू म्हणजे धान्याच्या रूपानें आलेली लक्ष्मीच आहे असें आपण मानतों. लक्ष्मी म्हणजे धान्य हीच धारणा वरील रूढीवरून स्पष्ट होते.

आपल्या सर्व धार्मिक संस्कारांत अक्षतांना (तांदुळांना) अनन्यसाधारण महत्व त्यामुळेंच प्राप्त झालेलें आहे. गणपतीची पूजा अथवा हरितालिकेची पूजा असो त्यांना आसन-आधार म्हणून तांदूळच ठेवीत असतों. सत्यनारायण, सत्यविनायक वा सत्यदत्त असो. तांदुळांवर कलश, कलशावर ताम्हन व त्यांत पुनः तांदूळ ठेवून त्यांवर देवतेची स्थापना करतों. सुवासिनीची ओटी भरतांना, औक्षण करतांना तांदूळ आवश्यकच मानले जातात. वहीण भाऊबिजेचे दिवशीं ओवाळते तेव्हांही ताम्हनांत चिमटीभर तांदुळावर नीरांजन ठेवते मग भावाला कुंकुमतिलक लावून त्यावर चार अक्षता लावते आणि मग ओवाळते. नवग्रहांची असो, सप्तर्षींची असो वा देव-देवतांची पूजा असो त्यांची स्थापना तांदुळांवर वा गव्हांवर म्हणजेच धान्यावर केली जाते. प्रत्यक्ष धनराज कुबेराची मुद्रा स्थापना धान्याच्या राशीवरच केली जाते. पैशांच्या राशीवर केली जात नाहीं. सर्वांच्या अस्तित्वाचा मूलाधार 'धान्य'च आहे, हेंच वरील सर्व आचारांतील अनुस्यूत तत्व आहे.

आपल्या सर्व पूजा पद्धतींत आणखी एक

मोठी गमतीचा पण अर्थवाही आचार आहे. गंध-पुष्प-धूपदीप इत्यादि षोडशोपचारांनीं आपण पूजा करीत असतों. वस्त्र उपवीत इत्यादि वस्तु सदा सर्वकाळ सर्वांना उपलब्ध असण्याची शक्यता कमी असते. राजोपचार, दिव्योपचार तर अशक्य, अप्राप्यच असतात. पण आपण थांबत नाहीं. आसनार्थे, वस्त्रार्थे, राजोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि असें म्हणून अक्षता वहातों आणि पूजा पूर्ण करीत असतों. आवाहन असो, विसर्जन असो वा पुनरागमनाची इच्छा व्यक्त करणें असो आपण तें अक्षतांनींच करीत असतों.

येथें लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे वस्त्रापासून दक्षिणेपर्यंतच्या वस्तूंऐवजीं अक्षता अर्पण करतात. पण अक्षतांच्या ऐवजीं पैसे रुपये अर्पण करण्याची प्रथा नाहीं. रुपया मोहरांनीं भरलेल्या कोठारांचा मालक असला तरी अक्षतार्थे रुप्यकान् समर्पयामि असें म्हणत नाहीं. करीत नाहीं. बरोबरच आहे—पैशांऐवजीं धान्य चालेल पण धान्याऐवजीं पैसे चालणार नाहींत. कारण ते खातां येणार नाहींत. उलट त्यांच्या मोबदल्यांत चढ्या भावानें धान्य खरेदी करावें लागणार. म्हणूनच दुष्काळी कामावर मजुरी करणाऱ्या भुकेल्या कामगारांना धान्याच्या रूपानें मजुरी देण्याची पद्धति आहे.

या सर्वांचा धान्य म्हणजेच लक्ष्मी हाच मथितार्थ आहे, नाहीं का ?

म्हणूनच प्राचीन उपनिषद्कारांनीं, 'अन्नं ब्रह्मेतिव्यजानात्' 'अन्नाद्भवन्तिभूतानि' 'अन्नेभ्यः प्राणाः प्रजायन्ते' (अन्नधान्य म्हणजेच विश्वाचें आदिकारण ब्रह्म होय, अन्नापासूनच प्राणिमात्रांचीं शरीरें आणि प्राण उत्पन्न होतात) असें कटाक्षानें सांगितलें आहे. द्रव्यं-सुवर्णं ब्रह्म असा उल्लेख नाहीं.

तात्पर्य अन्नधान्य हीच खरी लक्ष्मी. तिचें सर्वांनींच पूजन केलें पाहिजे. पूजन-पूजा म्हणजे कृतज्ञ रहाणें, कृतज्ञतेची अभिव्यक्ति करणें. 'कृतं जानाति इति कृतज्ञः' कृतज्ञस्य भावः कृतज्ञता. केलेलें (आपण वा दुसऱ्यानें) जाणतो. तो - कृतज्ञ केलेल्या - बऱ्याबाईट कृतींची-कर्मांची जाण ठेवून वागण्याच्या प्रवृत्तीला कृतज्ञता म्हणतात. व्यवहारांत लोकांनीं आपणावर केलेल्या उपकारांची सहाय्याची जाणीव असणें-ठेवणें म्हणजे कृतज्ञता असा अर्थ रूढ आहे. दुसऱ्यांनीं आपणावर केलेल्या अपकारांची जाण ठेवयाला कृतज्ञता म्हणत नाहींत. त्याला 'झुल धरणें' म्हणतात. त्यांत सूडाची भावना उत्कट असते.

जीवनांत आपण वा इतरांनीं, शत्रूंनीं वा मित्रांनीं केलेल्या प्रत्येक कृतीची आठवण असणें—ठेवणें इष्ट आहे, अपरिहार्य आहे, असा कृतज्ञ शब्दाचा वाच्यार्थ असला तरी, इतरांनीं आपल्याला केलेल्या सहाय्याची जाणीव ठेवणें व तदनुसार वागणें हा कृतज्ञ शब्दाचा ध्वन्यर्थ आहे. गर्भितार्थ आहे.

उपकारकर्त्याच्या उपकारांची परतफेड करण्याची वृत्ति ठेवणें असा ही कृतज्ञता शब्दाचा भावार्थ आहे. तो फार मोलाचा आणि माणुसकीचा विकास करणारा आहे. या परतफेडीच्या व्यवहारांत एक महत्त्वाचें व्यापक सूत्र आहे तें असें 'अ'नें 'ब'ला मदत केली तर 'ब'नें 'अ'लाच मदत केली पाहिजे असें नाहीं. आवश्यकता असेल तर

त्याला मदत करणें योग्यच परंतु त्याच्यावर मदत घेण्याचा प्रसंग यावा आणि मग आपण त्याला मदत करावी अशी इच्छा बाळगणें, म्हणजे पर्यायानें आपणाला मदत करणाऱ्यावर मदत घेण्याचा प्रसंग यावा असा त्याचा अर्थ होतो. तसें अपेक्षिणें हें एका अर्थानें कृतघ्नतेचेंच ठरेल नाहीं का ?

म्हणून आपणाला कोणी मदत केली तर ती ध्यानांत ठेवणें, दुसऱ्याला मदत करणें, (तो आपला सहाय्य कर्ता असो वा नसो) म्हणजे कृतज्ञता. केवळ 'परतफेड' ही संकुचित, मर्यादित व वैयक्तिक असते. 'अ'नें 'ब'ला, 'ब'नें 'क'ला आवश्यकतेनुसार सहाय्य करीत रहाणें हें कृतज्ञतेचें व्यापक रूप आहे. मानवतेचा विकास आणि संरक्षण करणारें सुदर्शन चक्र आहे. तें सतत गतिशील राहिलें पाहिजे.

अशा या कृतज्ञतेच्या अभिव्यक्तीचें 'पूजा' हें सुलभ साधन आहे. आपण इतरांना सहाय्य करूं शकूं किंवा कदाचित करूं शकणार नाहीं, परंतु उपकारकर्त्याचें स्मरण ठेवणें, त्याच्याबद्दल आदर बाळगणें सहज शक्य आहे. निदान तेवढें तरी प्रत्येकानें केलें पाहिजे. देवानें आपणाला पुष्कळ दिलें आहे. आपण देवाला काय देणार ! अनंत हस्तें देणाऱ्या कमलावराला, दोन हातांचा मानव काय देणार ? भास्वान सहस्ररश्मि आपल्या सहस्र करांनीं सागराचें क्षारयुक्त जल शोषून घेतो आणि मधुर जलाचा सान्या क्षुधार्त भूमंडलावर अभिषेक करतो त्याला मानव आपल्या इवल्याशा दोन हातांनीं काय आणि किती देणार !

पण देतो. कृतज्ञ मानव आपल्या दोन हातांनीं सूर्याला अर्घ्य देतो. नमस्कार करतो. तें अर्घ्य आणि ते जोडलेले हात हीच पूजा आहे. तिनेंच समाधान लाभतें आणि आपणाला सूर्यनारायण भरपूर जल देतो तर आपणही तृषार्तांना घोटभर तरी पाणी दिलें पाहिजे ही जाणीव निर्माण होते.

कोणत्याही देवतेच्या पूजेंत—मग ती षोडशोपचार असो वा पंचोपचार असो, समंत्रक असो, अमंत्रक वा नामोच्चारमूलक असो—कृतज्ञतेची जाणीवच अभिप्रेत असते हें निश्चित.

अन्न हें पूर्ण ब्रह्म आहे, धान्याची राशि हीच खरी लक्ष्मी आहे. तिचें पूजन हेंच खरेंखुरें लक्ष्मीपूजन आहे. रुपयांच्या राशींचें, हिशेबांच्या वह्यांचें पूजन करा वा न करा पण अश्विन वद्य अमावास्येला घरांत येणाऱ्या धान्यलक्ष्मीचें पूजन सर्वांनीं अवश्य करावें. यथासांग पूजा करावी. शक्य नसेल तर—

धान्यलक्ष्मि नमस्तुभ्यं ।
सौख्यदे जीवनप्रदे ॥
सततं वर्धमाना त्वम् ।
कुरु नः सर्वमंगलम् ॥

अशी हात जोडून प्रार्थना करा. प्रार्थना ही पूजाच आहे. तिनें सुद्धां स्वयंतृप्ता धान्यलक्ष्मी संतुष्ट होईल. सर्वांना तृप्त करील. अशी आमची दृढ श्रद्धा आहे. म्हणून सर्वांना सुलभतेनें पूजा करतां यावी या भावनेनें या अंकासोबत लक्ष्मीपूजनाची पोथी देत आहोंत. आमच्या सश्रद्ध वाचकांनी तिचा स्वीकार व उपयोग करावा अशी प्रार्थना आहे.

दारीं हत्ती झुलती.....

'गजान्तलक्ष्मी' असा वाक्प्रचार मराठींत रूढ आहे. अतिशय श्रीमन्त धनिकाला उद्देशून त्याच्या घरीं गजान्त लक्ष्मी वास करीत आहे, त्याच्या दारीं हत्ती झुलत आहेत असें म्हणण्याची वहिवाट आहे. हत्ती बाळगणें ही श्रीमंतीची-वैभवाची चरमसीमा मानली जात असे म्हणून 'गजान्तलक्ष्मी' हा शब्दप्रयोग रूढ झाला.

आपल्याकडे गज हें वैभवाचें प्रतिक मानलें गेलें आहे. सुखसमृद्धि आणि मांगल्याची देवता असलेला गणपति 'गजानन' आहे यांतील मर्मही तेंच आहे. 'ऋद्धिसिद्धींचा नायक। गजवदन गणपति' असा संतवाङ्मयांतील उल्लेखही तेंच सूचित करतो. ऋद्धि म्हणजे समृद्धि—धनधान्यादिकांची विपुलता, आणि सिद्धि म्हणजे हवे ते मिळवून देणारी अलौकिक शक्ति. या ऋद्धि आणि सिद्धि यांत समतोल राखून त्यांवर अंकुश ठेवण्याकरतां शारीरिक व मानसिक सामर्थ्य, बुद्धिमत्ता आणि संतुलनशील शान्त मनोवृत्ति या गुणांची आवश्यकता असते. संपत्ति निर्माण करण्याकरतां प्रचंड शक्ति लागते तशीच ती पेलण्याकरता ही प्रचंड शक्ति लागते. प्राण्यांमध्यें हत्तींत ती प्रचंड ताकत आणि बुद्धिमत्ता असल्यामुळें तो संपत्तीचें प्रतिक मानला गेला असावा असें दिसतें. देवदानवांनीं मोठ्या कष्टानें सागराचें मंथन करून चौदा रत्नें मिळविलीं त्यांत गजरत्न 'ऐरावत' होता हें ही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

लक्ष्मी पूजनाचें दिवशीं व्यापारी लोकांच्या पूजासाहित्यांत 'गजलक्ष्मीचें' चित्र असतें. त्या चित्रांत लक्ष्मीच्या दोन बाजूला दोन हत्ती सोंडेंत पुष्पमाला घेऊन उभे असल्याचें दृश्य असतें. वेरूळ येथील सुप्रसिद्ध कैलास लेण्यांत 'गजलक्ष्मी' नांवाचें अप्रतिम शिल्प आहे. त्यांत एका विशाल सरोवरांत मध्यभागीं कमलावर लक्ष्मी विराजमान झालेली आहे. तिच्या दोन्ही बाजूला सोंडेंत 'कलश' घेतलेल्या लहान मोठ्या हत्तींची मालिका दाखविलेली आहे. त्याचा आशय तेथील माहितगार स्पष्ट करून सांगतात तो हृद्य आणि वास्तव आहे. खालच्या बाजूला असलेला हत्ती सरोवरांतील जलानें भरून घेतलेला कलश वरच्या बाजूला असलेल्या हत्तीला देतो आणि मग तो हत्ती त्या कलशांतील जलाचा लक्ष्मीवर अभिषेक करीत असतो. लक्ष्मीच्या दोन्ही बाजूनें झुलत उभे असलेले हे हत्ती आपल्या करांनीं (सोंडेनें) लक्ष्मीवर अखंड अभिषेक करीत असल्याचें हें शिल्प बोलकें आहे. हत्तींच्या गळ्यांतील व अंगावरील लहान मोठ्या घंटांच्या स्थितीवरून ते झुलत झुलत जलभरणाचें व अभिषेकाचें काम करीत आहेत ही गोष्ट सहज लक्षांत येते. चंचल जलाशयांत हलक्या हळुवार वायुलहरींनीही कंपित होऊं शकणाऱ्या कमलावर विराजमान झालेल्या लक्ष्मीच्या मुखमंडलावर शांततेचे, प्रसन्नतेचे आणि विशेषतः स्थिरतेचे भाव साकार केले आहेत. असे भावाविष्कारांचे अनेक बारकावे या लेण्यांत आहेत त्यांतील आणखी एक बारकावा मोठा हृद्य आहे, तो असा—बलदंड गजराज लक्ष्मीवर अभिषेक करण्याकरतां आपल्या बलशाली सोंडेंत धरलेले कलश भरून घेतांना सरोवरांत उत्पन्न होणाऱ्या जललहरी एका बाजूला झुकलेल्या कमलपत्रांनीं सूचित केल्या आहेत. जलभरणाच्या क्रियेनें तरंगित जलाशय, तरंगांनीं

इकडेतिकडे झुकणाऱ्या कमलिनी, झुलत झुलत पण स्थिरपणानें सतत अभिषेक करणारे गजराज, आणि तरंगानीं दोलायमान होणाऱ्या जलाशयांतील एका स्थिर कमलावर 'बद्धपद्मासना' स्थिरलक्ष्मी असें हें शिल्प प्राचीनांच्या कलेचें 'लेणें' आहे यांत शंकाच नाहीं, पण त्यांत शिल्पकलेबरोबरच लक्ष्मी–संपत्ति–समृद्धिविषयक भारतीय संस्कृतीच्या संकेतांचें घडविलेलें दर्शन हृदयंगम आहे. बलवान् आणि बुद्धिमान गजराज, हा धनधान्य संपत्तीचा सूचक संकेत आणि विपुल बलराशी ही संपत्तीचें प्रमुख साधन असल्याचा संकेत यांच्या सहाय्यानें 'स्थिरलक्ष्मीचें' दर्शन गजलक्ष्मी या शिल्पांत घडतें.

हत्तीचे ठिकाणीं प्रचंड बल, सूक्ष्मदृष्टि, तरलबुद्धि शान्त मनोवृत्ति, प्रबल संवेदन शक्ति, स्थिरता आणि दुसऱ्याचे गुणधर्म आणि योग्यता पारखण्याची अद्भुत शक्ति असते. निसर्गानेंच त्याला ती प्राप्त झालेली असते. म्हणून पूर्वीच्या काळीं एकाद्या राज्यांत 'राजा' निवडण्याची वेळ आली तर ती निवड करण्याचें अत्यंत बिकट काम हत्तीवर सोपवीत असत. त्याच्या सोंडेंत पुष्पमाला द्यायची आणि त्याला मोकळा सोडायचा आणि तो ज्याच्या गळ्यांत माळ घालील त्याला सिंहासनावर बसवायचें. असे अनेक प्रसंग प्राचीन साहित्यांत वर्णिले आहेत. आणि अशा रीतीनें निवडलेल्या राजांपेक्षां एकादाही राजा वाईट निघाल्याचें वर्णन कोठेंही आढळत नाहीं.

असे हे राजालाही निवडण्याची नैसर्गिक शक्ति असलेले गजराज सर्व संपत्तीचें प्रमुख कारण असलेल्या जलाचा ('अद्भ्यः पृथ्वी') जलापासून पृथ्वी निर्माण झाली. मत्स्य कूर्म हे अवतार जलांत झाले. जलापासून निर्माण झाले, प्रसिद्ध चौदा रत्नें जलांतूनच प्राप्त झालीं वगैरे सर्व प्राचीन संकेत लक्षांत घेतले म्हणजे 'जल' हें सर्व संपत्तीचें मूलकारण मानण्यांतील मर्म लक्षांत येईल.) निरंतर अभिषेक होत असल्यामुळें 'लक्ष्मी' कमलासनावर स्थिरपणें विराजमान होत आहे हें गजान्तलक्ष्मी लेण्यांतील रहस्य आहे. 'गजान्तलक्ष्मी किंवा दारीं हत्ती झुलती' या वाक्प्रचारांतही हाच अर्थ अभिप्रेत आहे.

परंपरा टिकली तर....

शास्त्र म्हणजे एकाच्या वा अनेकांच्या अनुभवांचें सार. अनेक घटनांनीं सुस्थिर झालेले अनुभव लिपिबद्ध होऊन ग्रंथरूपानें साकार झाले म्हणजे ते शास्त्र नांवानें ओळखले जातात. ग्रंथांतील भाषा पारिभाषिक स्वरूपाची असल्यामुळें ते स्वाभाविकपणें सामान्य लोकांना समजणें कठिण होतें. उदाहरणार्थ—ज्योतिषशास्त्रांत ग्रहांची गति, त्यांचे उदय अस्त, त्यांचे वातावरणावर व प्राणिजीवनावर होणारे परिणाम यांचा विचार केला आहे. पण ते विचार सर्वसामान्यांना आकलन होत नाहींत. शेतकरी लोकांना पाऊस कधीं पडेल, किती पडेल याची माहिती असणें निकडीचें असतें. पण तें ग्रंथांच्या द्वारा मिळविणें कठीण व अशक्य असतें. 'पुस्तकस्था विद्या' पुस्तकांतच रहाते आयत्या वेळीं उपयोगी पडूं शकत नाहीं. हें लक्षांत घेऊन व्यवहारी, विचारी व अनुभवी

लोक आपले अनुभव, ठोकताळे सामान्य लोकांच्या भाषेंत पद्यबद्ध करून ठेवतात, आणि ते परंपरेनें लोकांच्या तोंडी असल्यामुळें वेळोवेळीं उपयोगीं पडतात.

सरड्यांचें डोकें तांबडें झालें, ठराविक जातीचे मासे किनाऱ्याकडे येऊं लागले किंवा काळे घरटीं बांधूं लागले म्हणजे पाऊस जवळ आला असें समजून आपल्याकडले शेतकरी शेतीच्या कामाला सुरुवात करतात. पावसाविषयींचे वरील आडाखे पद्यबद्ध नाहींत. कांहीं दिवसांपूर्वी हिंदी भाषेंतील कांहीं आडाखे पहाण्यांत आले. ते असे—

'सावन शुक्ला सप्तमी उगत न दीखे भानु।
तबतक वर्षा होयेगी जो आवें देवठाण।'

श्रावण शुद्ध सप्तमीला सूर्योदय न दिसण्याइतके आकाशांत ढग असतील तर कार्तिक अखेरपर्यंत चांगला पाऊस पडेल.

"सुदी आषाढ की पंचमी गर्ज धमाधम होय!
तो जानी यह भद्दुरी मधुरी वर्षा होय॥"

आषाढ शुद्ध पंचमीला गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली तर शेवटपर्यंत चांगला पाऊस पडेल.

"आखाडी शुक्ला नवमें गर्भे ऊगे भानु।
तीन माह तेरह दिन वर्षा के परमानु॥

आषाढ शुद्ध नवमीला आकाश ढगांनीं भरलें असतांना सूर्याचा उदय झाला तर तीन महिने तेरा दिवस पाऊस पडेल.

"माघे सुदी आठें घन बरसे।
तौं महिनाभर सावन बरसे॥"

माघ शुद्ध अष्टमीला पाऊस पडला तर पुढल्या वर्षीच्या श्रावणांत महिनाभर पाऊस पडेल.

"मटुका में पानी गरम, चिडिया नहावे धूर।
चिंटी अंडा लै चलै, तो वर्षा नहीं दूर॥"

माठांतलें सुद्धां पाणी गरम होऊं लागलें, चिमण्या धुळींत लोळूं लागल्या आणि मुंग्या आपलीं अंडीं एका ठिकाणाहून दुसऱ्या जागीं नेऊं लागल्या म्हणजे पावसाळा जवळ आला असें समजावें.

"चंदा बैठो मातनी सूरज बैठो कच्छ।
ऐसा बोले भद्दुरी बांगर लोटै मच्छ॥"

चंद्राला किंवा सूर्याला मोठें खळें पडलें तर समजावें कीं प्रचंड अतिवृष्टी होणार आहे. नद्या ओसंडून वहातील. उंचावर असलेल्या सुद्धां क्षेत्रांतून लहान मोठे मासे तरंगूं लागतील.

"सावन पहली पंचमी घन गरजे आधी रात।
बहे खेतर सूखा पडे छोडना पडें घरदोर॥"

श्रावणांतल्या पहिल्या पंचमीच्या मध्यरात्रीं मुसळधार पाऊस पडेल, तर शेतीवाडी वाहून जाईल. दुष्काळ पडेल. गुरंढोरें टाकून देशान्तर करावें लागेल असें समजावें.

परंपरा टिकली तरी वरील आडाखे, ठोकताळे सहज पाठान्तरांत राहून व्यवहार सुलभतेनें स्वतंत्रपणें करतां येतात. पण परंपरा टिकली-टिकविली तर. न टिकली तर 'आकाशवाणीकडे' कान आणि डोळे लावून बसावें लागतें...

जमीन अस्मानाचें अन्तर....

दोन वस्तूंत किंवा घटनांत फार मोठें अन्तर असलें म्हणजे आपण त्यांत जमीन असमानाचें अन्तर आहे असें म्हणत असतों. यांतील असमान-अस्मान आसमान किंवा आस्मान हा आकाशवाचक शब्द संस्कृत किंवा मराठी नाहीं. परकीय आहे, पण तो मराठींत अगदीं रुळला आहे. वस्तुतः पृथ्वीपासून आकाश दूर आहे, दोहोंमध्यें फार अन्तर आहे ही कल्पना अवास्तव आहे. कारण आकाश म्हणजे पोकळी पृथ्वीपासून मुळींच दूर नाहीं. दूर नाहीं इतकेंच नव्हे तर प्रत्येक पार्थिव पदार्थांत तें अन्तर्भूत झालें आहे. जसें 'अणुमाजी ब्रह्म, रेणुमाजीं ब्रह्म' आहे त्या प्रमाणें अणुरेणूंतही आकाश भरून राहिलेलें आहे. आकाश हें पंचमहाभूतांतील एक असल्यामुळें व हें सर्व विश्व पंचमहाभूतांपासूनच निर्माण झालें असल्यामुळें विश्वांतील वस्तुमात्रांत इतर पृथ्वी, आप्, तेज व वायु यांप्रमाणेंच आकाशही भरून राहिलें आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. ज्याला आपण व्यवहारांत आकाश म्हणतों व जें फार दूर आहे असें म्हणतों, किंवा निळें आहे, काळें आहे, स्वच्छ आहे असें म्हणतों तें लाक्षणिक आहे. आभासात्मक आहे. कारण आकाश हें अमूर्त आहे. निराकार आहे.

संस्कृत भाषेंत द्यो, दिव्, अभ्र, व्योम, पुष्कर, अम्बर, नभस्, अन्तरिक्ष, गगन, अनन्त, सुरवर्त्म, ख, वियत्, विष्णुपद, आकाश व विहायस अशीं १६ नावें प्रसिद्ध आहेत. त्यांतील कोणत्याही शब्दाशीं आसमान शब्दाचा व्युत्पत्तिदृष्ट्या संबंध जुळत नाहीं, हें खरें, पण आकाशाविषयीं संस्कृत वाङ्मयांत, मराठींतील संत वाङ्मयांत सर्वत्र समानत्व, व्यापकत्व, निर्मलत्व इत्यादि गुणविषयक संकेत वर्णिलेले आहेत त्यांच्या अनुरोधानें 'आसमान' किंवा असमान शब्दाची व्युत्पत्ति-उपपत्ति (मुळांत तशी असो वा नसो) अत्यंत अर्थपूर्ण आहे, ती अशी—

आ+समान सर्वत्र समान.

अ+समान 'अचपलमन' या प्रमाणें ज्याच्या इतकें सर्वसमान दुसरें कोणी नाहीं तें असमान. या कल्पनेनेंच 'गगनं गगनाकारं' आकाश आकाशासारखें आहे. आकाशाला दुसऱ्या कोणाचीही उपमा नाहीं असें सुभाषित प्रसिद्ध आहे.

आशामान या शब्दापासून 'आसमान' शब्द मराठींत आला अशी ही कल्पना सयुक्तिक वाटते. आशा शब्दाचा दिशा असा अर्थ प्रसिद्ध आहे.

'दिशस्तु ककुभः काष्ठा आशाश्च हरितश्च ताः ॥' १।३।१

असे दिशावाचक शब्द अमरकोशकारांनीं दिले आहेत. यांत 'आशा' शब्दाची व्युत्पत्ति 'आसमन्तात् अश्नुतें' इति आशा अशी आहे. अश्नुते यांत 'अश्' धातु असून त्याचा अर्थ व्यापणें असा आहे. जी सर्वत्र व्यापून असते ती आशा. आशांचें मान तें आशामान–आसमान. दिशा आकाशनिष्ठ आणि आकाशनिरूपितच आहेत म्हणून आसमान हा शब्द सयुक्तिक वाटतो.

'आशा' शब्दाचा इच्छा, तृष्णा या अर्थी संस्कृत वा मराठींत सरसहा वापर केला जातो. त्या दृष्टीनें सुद्धां आशेचें मान म्हणजे प्रमाण या अर्थानें आशामान-आस-

मान अशी ही शब्द संगति बरोबर जुळते. आशा ही आकाशाइतकी किंबहुना अधिक व्यापक आहे. आकाशाप्रमाणें आशा अनन्त आहे. 'आशावधि को गतः' असें एक प्रसिद्ध सुभाषित आहे तें खरें आहे.

आसमान शब्द स्वकीय असो वा परकीय असो, त्याचा अनन्त, अपार, सर्वव्यापी, निरपेक्ष, निर्लेप आणि कोणत्याही वस्तूशी तदाकार होणारें आकाश हाच अर्थ आहे. तें आकाश कल्पनांचा स्वर्ग निर्माण करण्याचें स्थान आहे. सर्व आशा पूर्ण करणारा परमेश्वर आकाशांतच रहातो अशी बहुतेकांची श्रद्धा असल्यामुळें मानवाला आकाशाचें 'वेड' आहे. अनंत कोटी ब्रह्मांडांना सहज सामावून घेणाऱ्या या अनन्ताचा वेध घेण्याचे प्रयत्न प्राचीन ऋषिमुनींपासून आजच्या प्रगत वैज्ञानिकांपर्यन्त अखण्ड चालू आहेत. ते विश्वाचें, विश्वाच्या निर्मितीचें आणि त्याच्या निर्मात्याचें गूढ समजून घ्यावें या हेतूनेंच ते प्रयत्न सुरू आहेत.

विहंगमाप्रमाणें आकाशांत मुक्त संचार करावा असें सामान्य माणसांनाही वाटतें, पण तें शक्य होत नाहीं म्हणून चार भिंतींमधील कोंदट आकाशांतून बाहेर पडून नदीच्या वा समुद्राच्या तीरावरील स्वच्छ-विशाल आकाशांत किंवा टेकडीवरील वा डोंगर पर्वतावरील उद्यानांत जाऊन तेथील ध्वनिप्रदूषणरहित निर्मल आकाशांत (मोकळ्या जागेंत) कांहीं काळ स्वच्छन्द विहार करून समाधान-स्वास्थ्य-आनंद मिळविण्याचा प्रयत्न आपण करीत असतो.

सकाळी वा संध्याकाळीं विशेषतः सकाळी शान्त प्रसन्न वेळीं फिरायला जाण्याचा मुख्य उद्देश मनाला शान्तता समाधान मिळवणें हाच असतो, असला पाहिजे. व्यायाम हें फिरण्याचें प्रमुख उद्दिष्ट नाहीं. घरांतील कोंदट वातावरण, कथाकाळ्या, भोवतालचे तंटेबखेडे व संघर्ष यांपासून दूर जाऊन अनन्त आकाशाच्या विशालतेचा, व्यापकतेचा, उदारतेचा आणि निर्लेप प्रसन्नतेचा अनुभव घेत कांहीं काळ तरी मन शान्त प्रसन्न रहावें या करतां फिरायला जाणें आवश्यक असतें.

सर्व दुःखाचें कारण असलेला संकुचित अहंभाव विसरून अनन्त अपार परमोदार निसर्गाशीं क्षणभर तरी एकरूप होण्याकरता मोकळ्या हवेंत फिरायला जायचें असतें... पण आपण फिरायला जातों ते घरदार, अडीअडचणी, रागलोभ सर्व बरोबर घेऊन जातों. नोकरीचाकरीतल्या भानगडी मित्रांना सांगण्याकरतां फिरायला जातों. राजकारणाची घाण उपसण्याकरतां फिरायला जात असतों. मी असें केलें तसें केलें अशी आत्मप्रौढी मिरविण्याकरतां आपण 'फिरण्याचा' उपयोग करीत असतों. हें खरें फिरणें नव्हे.

अहंभाव संकुचितपणा विसरून भव्योदात्त निसर्गाशीं एकरूप होण्याकरतां फिरणें आणि अहंभाव फुलविण्याकरतां फिरणें यांत जमीन-अस्मानाचें अन्तर आहे.

फिरायला जा, अवश्य जा पण अहंभाव विसरून जा. तरच मनाला उल्हास लाभेल. शांतता लाभेल.

तुझ्या चरणींच्या गंगा.....

भगवती भागीरथी गंगा भगवान् श्रीविष्णूच्या चरणकमलापासून, त्याच्या डाव्या पायाच्या आंगठ्यापासून निर्माण झाली असें पुराणांत वर्णन करून सांगितलें आहे. त्यावर महाकवींनीं अनेक आलंकारिक रचनाही केल्या आहेत. एका कवीनें विष्णूचें वर्णन करतांना लिहिलें आहे, हे भगवन् तूं 'कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं' समर्थ आहेस. भूतळावर पाण्यापासून कमलें निर्माण होतात, परंतु सर्वसमर्थ असलेल्या तूं आपल्या चरण-कमलापासून त्रैलोक्यपावनी गंगा निर्माण केली आहेस. आपले संतकविसुद्धां; कृष्णा, गोदा, भीमा, चंद्रभागा इत्यादि नद्यांना सुद्धां 'तुझ्या चरणींच्या गंगा' असें म्हणतात.

विष्णुपदापासून गंगा निर्माण झाली असें म्हणण्यांत काव्यात्म रमणीयता आहे, सर्वश्रेष्ठ पावनत्वाची सूचकता आहे व विष्णूच्या सान्निध्याचें चराचर पालकत्वाची व्यंजकता सुद्धां आहे. पण त्याचबरोबर वास्तवता सुद्धां आहे. खरोखरच गंगा विष्णुपदापासून निर्माण झाली आहे. गंगाच काय, कृष्णा, गोदा, चंद्रभागा सुद्धां विष्णु-पदापासूनच निर्माण झाल्या आहेत. सर्वसामान्य लोकांना त्यांत भक्तिमूलक काव्यत्व दिसतें त्याचें कारण 'विष्णुपद' या शब्दाच्या मूळ अर्थाची कल्पना नसणें हें आहे. विष्णूचें पद तें विष्णुपद. विष्णू म्हणजे भगवान विष्णु त्याचं पद म्हणजे पाय हा सरळ अर्थ प्रसिद्ध. त्याच्या अनुरोधानें आपण आपली श्रद्धामूलक समजूत करून घेतली आहे. ती योग्य आहे व गंगेबद्दलच्या निष्ठेच्या दृष्टीनें उपकारकच आहे.

परंतु मुळांत 'विष्णुपद' शब्द आकाश-वाचक आहे. 'वियद् विष्णुपदंचापि पुंस्याकाशविहायसि', वियत्, विष्णुपद, आकाश व विहायस हे शब्द आकाशवाचक आहेत असें अमरकोशकारांनीं ग्रथित केलें आहे. मेघ आकाशांतून जल-वर्षाव करतात व तें जल गिरिकंदरांत मुरतें व नदीच्या रूपानें प्रकट होतें ही वस्तुस्थिति आहे. यावरून गंगा यमुना इत्यादि नद्या, इतकेंच नव्हे तर पृथ्वीवरील सर्व जल विष्णुपदापासूनच निर्माण होतें हें सत्य आहे. यावरून गंगा विष्णु-पदापासून निर्माण होते ही वस्तुस्थिति आहे.

आतां आकाशाला विष्णुपद हें नांव कां दिलें ? अशी जिज्ञासा उत्पन्न होणें स्वाभाविक आहे, कारण संस्कृत भाषेंतील प्रायः सर्व शब्द व्युत्पत्तिसिद्ध व अन्वर्थ आहेत. पद म्हणजे पाऊल, स्थान हे अर्थ सर्व परिचित आहेत. पद म्हणजे स्वरूप हा कांहींसा व्यवहारांत अप्रसिद्ध अर्थ कोशांतून दिलेला आहे. तुकाराम महाराज ब्रह्मपदीं विलीन झाले या ठिकाणीं ब्रह्मस्वरूपीं विलीन झाले. (ब्रह्माशीं एकरूप झाले.) इत्यादि ठिकाणीं पद चा अर्थ स्वरूप असाच अभिप्रेत असतो. आकाश विष्णुरूप आहे. विष्णुः-वेवेष्टि इति विष्णुः । जो चराचराला पूर्णतया व्यापून रहातो तो विष्णु. आकाशही सर्व-व्यापी आहे. जेथें आकाश (पोकळी) नाहीं, अशी एकही वस्तु नाहीं. अणूत सुद्धां आकाश आहे हें आतां प्रयोगानें सिद्ध झालें आहे. विष्णु जसा सर्वव्यापी तसें आकाशही सर्व-व्यापी म्हणून आकाशाला 'विष्णुपद' हें सर्वव्यापी या अर्थाचें अन्वर्थ नांव दिलें आहे. कोण्या महाकवीच्या विश्वोत्तरी प्रतिभेतून तें अभिव्यक्त झालें आहे.

विष्णुपद म्हणजे आकाश या अर्थी आयुर्वेदाच्या प्रसिद्ध शार्ङ्गधर संहितेत उल्लेख आहे. तो असा—

"नाभिस्थः प्राणपवनः स्पृष्ट्वा हृत्कमलान्तरम्।
कण्ठात् बहिः विनिर्याति पातुं विष्णुपदामृतम्॥"

नाभिकमलांत असणारा प्राणपवन (वायु) हृदयकमलांत प्रवेश करून कण्ठांतून 'विष्णुपदामृत' प्राशन करण्याकरतां बाहेर पडतो. विष्णुपद म्हणजे आकाश, अमृत म्हणजे जीवनदायी प्राणवायू (ऑक्सिजन) असा अर्थ येथें अभिप्रेत आहे. प्राणिमात्रांचें जीवन ज्यावर पूर्णतया अवलंबून आहे असा प्राणवायू आणि जल आकाशांतून मिळतें, म्हणून आकाशाला विष्णुपद हें नांव रूढ झालें.

अनंत कोटि ब्रह्माण्डें आपल्या उदरांत समावून घेणारें अनंत आकाश विष्णुपद-विष्णुमय आहे, आणि खरोखरच त्यापासून निर्माण झालेली भगवती भागीरथी गंगा विष्णूइतकीच पावन आणि जीवनदायिनी मांगल्यकारिणी आहे.

कुशाग्र म्हणजे.....

'योगः कर्मसु कौशलम्' कर्म करण्यांतील कौशल्य म्हणजे योग असें भगवद्गीतेंत प्रतिपादन केलें आहे. कौशल शब्द कुशल शब्दाचें भाववाचक रूप आहे. कुशलस्य भावः कौशलम्. कुशल शब्दाची व्युत्पत्ति 'कुशं लुनाति' इति कुशलः अशी कोशकारांनी दिली आहे ती वास्तव आणि अर्थपूर्ण आहे. कुश म्हणजे दर्भ. एक विशिष्ट प्रकारचें उष्ण गुणधर्मांचें, अनुभवानें पवित्र मानलेलें गवत. धार्मिक संस्कारांत दर्भांचें अनन्यसाधारण महत्व आहे. कुश, कुथ, दर्भ आणि पवित्र अशीं त्यांचीं चार नांवें कोशकारांनीं दिलीं आहेत. पावयति—पवित्र करतें तें पवित्र. धार्मिक कार्यें करतांना हाताच्या अनामिकेंत (करंगळीजवळच्या बोटांत) पवित्रक घालतात. (तें पावित्र्य निर्माण करणाऱ्या दर्भांचें (पवित्रांचें) केलेलें असतें म्हणून 'पवित्रक' या नांवानें प्रसिद्ध आहे.) पूर्वी 'पवित्रक' नांवाची विशिष्ट रचनेची सोन्याची आंगठी वापरण्याची पद्धति होती. स्नान संध्या पूजा इत्यादि धार्मिक कर्में करतांना दर्भांच्या पवित्रकाऐवजीं सोन्याचें पवित्रक वापरण्याची पद्धति होती. सुवर्णाप्रमाणें दर्भही तेजोगुणप्रधान आहेत त्यामुळें रक्ताची वृद्धि, शुद्धि आणि अभिसरण करण्याच्या कामीं ते उपयुक्त ठरतात हें लक्षांत घेऊन दर्भांनें मार्जन करणें, दर्भासनावर बसणें, हातांत दर्भांचें पवित्रक घालणें इत्यादि गोष्टी आचारांत रूढ करण्यांत आल्या. तपस्वी तर 'शय्या'सुद्धां दर्भांचीच करीत असत.

असे हे पवित्र आणि आरोग्यकारक दर्भ कापतांना पुष्कळ दक्षता बाळगावी लागते. कांही नियम पाळावे लागतात. श्रावणांतील अमावास्येच्या दिवशींच ते कापून आणावे व वर्षभर वापरावे असा दण्डक आहे. हा व

असे अन्य दण्डक केवळ परंपरागत भावना—स्मक नाहीत. ते वास्तव आहेत. औषधी वनस्पतींतील ते ते विशिष्ट गुणकारी गुणधर्म ठराविक दिवशीच पूर्णरूपानें असतात म्हणून त्या ठराविक दिवशी ठराविक वेळींच त्या वनस्पति औषधी तोडून आणाव्या असा स्पष्ट निर्देश आयुर्वेदिक ग्रंथांत आहे. दर्भ ही एक औषधी वनस्पती आहे, ती नेमकेपणानें ठराविक वेळीं कापून आणण्याला दक्षता इत्यादि गुणांची आवश्यकता लागते हें लक्षांत घेऊन कोणतेंही काम तत्परतेनें, निष्ठेनें आणि व्यवस्थितपणें करणाऱ्याला 'कुशल' म्हणण्याची पद्धति सुरू झाली.

कौशल्य आणि बुद्धिमत्ता यांचें साहचर्य आहे. कौशल्याशीं जसा 'कुश' शब्दाचा संबंध आहे, तसाच प्रखर, तीक्ष्ण, सूक्ष्म, मर्मग्राही बुद्धि अशा अर्थी असलेल्या कुशाग्रबुद्धि शब्दांशीं सुद्धां अगदीं निकटचा संबंध आहे. कुशाच्या म्हणजे दर्भाच्या अग्राप्रमाणें-टोकाप्रमाणें असलेली बुद्धि ती कुशाग्र बुद्धि. दर्भाचें टोक अगदी बारिक आणि धारदार असतें म्हणून तें दुसऱ्याच्या शरीरांत (न वाकतां) चटकन घुसतें, त्या प्रमाणें जी बुद्धि ज्ञेय विषयांत (बोथट-पराभूत) न होतां चटकन प्रवेश करते (तो विषय चटकन समजून घेते) तिला 'कुशाग्र बुद्धि' म्हणतात. तद्वत् कुशाग्रप्रमाणें ज्याची बुद्धि आहे त्यालाही 'कुशाग्रबुद्धि' म्हणण्याचा प्रघात आहे. महाकवि कालिदासानें चौदा विद्यांत पारंगत असलेल्या कैकेयीला उद्देशून 'हे कुशाग्रबुद्धे' असें अभ्यर्थन संबोधन वापरलें आहे.

कौशल्य आणि कुशाग्रबुद्धि या शब्दांना कुश शब्दाच्या सान्निध्यामुळें अत्यंत प्राविण्य व प्रखर बुद्धिमत्ता या अर्थापेक्षां पावित्र्य-मांगल्य कारक असा वेगळा अर्थ प्राप्त झाला आहे.

स्वतःबरोबर लोकांच्या ही भस्माकरतां फेकल्या जाणाऱ्या कामांतील प्राविण्याला 'कौशल-कौशल्य' शब्द वापरणें उचित. जाणून बुजून लोकांचें वाईट झालें तरी हरकत नाहीं आपलें ठीक झालें पाहिजे या जाणिवेनें केल्या जाणाऱ्या कामांतील निपुणतेला कौशल्य शब्द वापरणें योग्य नाही. तसेंच विनाशकारी समाजहितविरोधी बुद्धि-बुद्धिमत्ता किंवीही सूक्ष्म-तरल-प्रभावी असली तरी तिला 'कुशाग्र' हें विशेषण देणें ठीक नाहीं. जी मंगल नाहीं, जी सर्वांच्या मांगल्याचा विचार करीत नाहीं ती खरें म्हणजे बुद्धिच नव्हे, मग तिला कुशाग्र कसें म्हणणार!

कोणत्याही कामांतील मांगल्यबुद्धीने सर्वहितार्थ संपादन केलेली निपुणता म्हणजे कौशल्य आणि कोणत्याही विषयांत सर्वहितार्थ पावित्र्याच्या, मंगलतेच्या भावनेनें व तत्परतेनें प्रवेश करून ज्ञान संपादन करणारी जी बुद्धि तीच खरी कुशाग्रबुद्धि.

कुशलता आणि कुशाग्र बुद्धिमत्ता, पवित्र्य व मांगल्य यांच्यावर अधिष्ठित असतात.

दादरला देणगी हातीं देण्याचा पत्ता :
श्री गंगाधर प्रिंटिंग प्रेस
वेस्टर्न रेल्वे फूटब्रिजच्या समोर
दादर, मुंबई २८

सद्धर्म प्रकाशन कार्यालय
९ कृष्णा सांची पथ, मुंबई ४०० ००७

दुर्लभः कार्यकर्ता....

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥
इति महति विरोधे वर्तमाने समाने
नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥

शार्ङ्ग. प. १३५३

केवळ राजाचें-राज्यकर्त्यांचें हित करणारा —पहाणारा नेता लोकांत अप्रिय ठरतो. निन्द्य ठरतो. अत्यावश्यक असलेल्या शासन संस्थेचा विचार न करतां, स्वभावतः अनिर्बन्ध स्वैर जीवनाची आवड असलेल्या लोकांच्याच हिताचा विचार व त्या करतां आंदोलनें करणाऱ्या नेत्याला शासन संस्था जवळ करीत नाहीं. अशा या तुल्यबल, बिकट परिस्थितींत, शासन संस्था सुस्थिर आणि बलवान राहील आणि प्रजाही सुखी राहील या दृष्टीनें कार्य करणारें नेतृत्व दुर्मिळ असतें.

प्रजेशिवाय राजा-शासन संस्था आणि शासन संस्थेशिवाय प्रजा जगूं शकत नाहीं. दोघांतही सामंजस्य पाहिजे.

तें नसेल तर !...

महाभारत घडेल···विनाश ओढवेल.

शासनसंस्था व प्रजा यांच्यांत अत्यावश्यक असलेलें सामंजस्य प्रायः दुर्मिळ असतें.

बहुरंगी प्रजेंत अदूरदर्शी लोकांचा भरणा फार मोठ्या प्रमाणांत असल्यामुळें, स्वैर व स्वार्थी प्रवृत्ति बलिष्ठ असतात व त्यामुळें सर्वसामान्य माणूस कोणतेंही बंधन-कायदा मानायला तयार नसतो. स्वच्छंद-स्वैर जीवन प्रत्येकाला हवें असतें.

सर्वांचा विचार करणाऱ्या शासन संस्थेला प्रजेवर कांहीं बंधनें घालणें अपरिहार्य असतें.

समाजांत स्वयंशासित लोक जवळजवळ नसतातच. प्रायः सर्व समाज परशासितच असतो. देव, धर्म, पाप, पुण्य, राजानें अथवा सरकारनें केलेल्या कायद्यांच्या भीतीनेच तो कांहीं प्रमाणांत कां होईना बंधनयुक्त जीवन व्यतीत करीत असतो. अनिच्छेनें कां होईना पण बंधनें पाळीत असतो. हें अनिच्छेनें बंधनें पाळणें चिरस्थायी असूं शकत नाहीं, कारण संधी मिळतांच बंधन झुगारून देण्याची प्रवृत्ति उफाळून येत असते.

'न व्यतीयुः प्रजास्तस्यनियन्तुर्नेमिवृत्तयः ?

रघुराजा राज्य करीत असतांना त्याची प्रजा चाकोरीच्या (जीवनाच्या ठराविक मर्यादांच्या) बाहेर जात नसे. आपण होऊन बंधनांचें परिपालन करीत असे. पण त्याही काळीं राजा आणि प्रजा यांच्यांत विरोध निर्माण झाला तर पूर्णपणें निरपेक्ष असल्यामुळें राजाचा आणि प्रजेचा विश्वास संपादन केलेले वसिष्ठांसारखे महर्षि तो विरोध दूर करीत. राजा आणि प्रजा यांच्यांत सामंजस्य निर्मित असत.

कायदा लोकहितकारकच असावा असें राजाला ठणकावून सांगत असत आणि प्रजेनें तो कायदा पाळलाच पाहिजे असें आवर्जून सांगत असत आणि स्वतःच्या आचरणानें पटवून देत असत. राजा व प्रजा यांच्यात एकरूपता निर्माण करीत असत.

वरील प्राचीन सुभाषितांत असा कार्यकर्ता दुर्मिळ असें म्हटलें आहे.

सुभाषितकारानें मंत्री किंवा नेता शब्द न वापरतां 'कार्यकर्ता' हा अर्थपूर्ण शब्द वापरला आहे. शासनसंस्थेच्या रागालोभाची व प्रजेंतील सर्वंग लोकप्रियतेची अपेक्षा-पर्वा न करतां जो कार्य, सत्कार्य करीत असतो तोच खरा कार्यकर्ता. तो दुर्मिळच असतो.

सेवेसीं श्रुत होय....

नमस्कार—

सद्धर्माचा तेविसाव्या वर्षाचा हा तिसरा अंक आमच्या सुहृद्वाचकांच्या हातीं देतांना आनंद होत आहे. मागील अंकाचें स्वागत केलें त्याप्रमाणें याही अंकांचें वाचक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

या अंकासोबत दिवाळीची अल्पशी भेट म्हणून सुलभ लक्ष्मीपूजनाची लहानशी पोथी पाठवीत आहों. तिचा स्वीकार करावा.

इतर अनेक पोथ्यांच्या मागणीप्रमाणें बऱ्याच वाचकांनीं 'लक्ष्मीपूजनाची' पोथी प्रसिद्ध करा अशी मागणी वारंवार केली होती तदनुसार ही पोथी प्रसिद्ध करीत आहोंत.

लक्ष्मीविषयक 'सद्धर्माचा' दृष्टिकोन कोणता आहे या विषयीं या अंकांत सविस्तर विवेचन केलें आहे. त्या दृष्टिकोनांतूनच पूजेची मांडणी केली आहे.

सस्यश्यामला धरतीनें दिलेलें सस्यधान्य हेंच खरें वैभव आहे. त्याचें वत्सल भावनेनें संपादन करणें, कृतज्ञतेनें त्याचें पूजन करणें हेंच खरें लक्ष्मीपूजन. आणि त्या सस्यश्यामल मातेला केलेलें खरेंखुरें वंदन होय. हा आमचा दृष्टिकोन वाचकांना मान्य होईल असा विश्वास वाटतो.

अंकाची देणगी वाढवितांना आम्हांला संकोच होत होता. परन्तु याबद्दल सभासदांनीं नाखुशी व्यक्त न करतां आनंदच व्यक्त केला याबद्दल आम्हांला समाधान झालें आहे. इतकेंच नव्हे तर कांहीं सभासदांनीं किमान देणगीहून जास्त देणगी दिली आहे त्याबद्दल आम्हीं त्यांचे ऋणी आहोत.

सद्धर्मांवर असाच लोभ असावा ही विनंति.

सुखी जीवनाचा मार्ग....

यान्ति न्यायप्रवृत्तस्य ।
तिर्यञ्चोऽपि सहायताम् ।
अपन्थानं तु गच्छन्तम् ।
सोदरोऽपि विमुंचति ॥

सन्मार्गानें जाणाऱ्याला पशुपक्षी सुद्धां सहाय्यक होतात आणि उन्मार्गानें—वाईट मार्गानें जाणाऱ्याला त्याचे सक्खे भाऊसुद्धां सोडून जातात.

न्यायप्रिय मर्यादापुरुषोत्तम सन्मार्गगामी प्रभु राजा रामचंद्राला जटायूनें सहाय्य केलें, स्वारीनें सहाय्य केलें आणि वानरांनीं अन्यायी रावणाबरोबरच्या युद्धांत प्राणपणानें सहाय्य केलें—

उलट उत्पथगामी रावणाला त्याचा भाऊ विभीषण सोडून गेला. त्याचा विरोधी बनला.

सन्मार्ग हाच सुखी जीवनाचा मार्ग आहे.

सद्धर्म प्रकाशन, पातंजल योगसूत्र.
सुलभ मराठी भाषान्तरासह. किंमत
पोस्टेजसह २० रुपये मात्र.

गिरगावांत देणगी हातीं देण्याचा पत्ता :
श्रीधर भालचंद्र आणि कंपनी
कापडाचे व्यापारी
१४८ प्रार्थनासमाज, गिरगांव, मुंबई ४

संपादक : हरि जनार्दन दामले
प्रकाशक व मुद्रक : अनंत विनायक धोरे, ९ कृष्णा सांची पथ, मुंबई ४०० ००७
मुद्रण स्थळ : मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगांव, मुंबई ४०० ००४